**प्रशासकीय मान्यता आदेश**

जा.क्र.नियोजन/प्रमा/डोंविका/२०१०-११/१४२०
जिल्हा नियोजन समिती,
जिल्हाधिकारी कार्यालय,हिंगोली
दिनांकः- ०८/१२/२०१०

**विषय :-** **डोंगरी विभाग विकास कार्यक्रम २०१०-२०११**
प्रशासकीय मान्यता आदेश
**संदर्भ** :- १) शासन निर्णय नियोजन विभाग क्रं.डोंविका-२००९/प्र.क्र.६/का-१४८३, दि. १८.०१.२०१०
२) शासन निर्णय नियोजन विभाग क्रं डोंविका-२०१०/प्र.क्र.-५१/का-१४८३, दि. १०.६.२०१०

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्र. १ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी जिल्हाधिकारी, हिंगोली या आदेशान्वये सोबतच्या विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविलेल्या एकुण रू. ५४.९८ लाख किंमतीच्या एकुण ७ कामांना **खालील अटींची पुर्तता करणेच्या अधिन राहून प्रशासकीय मंजूरी देत आहे.**

१. सदर कामांच्या अंदाजपत्रकांना संबंधित कार्यान्वयीन अभिकरणांनी तांत्रिक मंजूरी दिली. असल्याने तसेच प्रस्तावातील घेण्यांत आलेले वाहतुक दर योग्य व अचुक असल्या बाबत,व अंदाजपत्रक अदयावत दरसुचीने केले आहे या बाबतची व ईतर तांत्रिक बाबींची संपूर्ण जबाबदारी कार्यकारी अभिकरणाची राहील.
२. यंत्रणेने या कामाच्या खर्चाचा हिशेब रो.ह.यो.लेखा कार्यपध्दतीप्रमाणे स्वतंत्र ठेवावेत.
३. कार्यकारी यंत्रणेने कामांस प्रशासकीय मंजूरी दिलेल्या रकमेत काम करावे, मंजूरीपेक्षा जास्त खर्च करु नये. अंदाजपत्राकापेक्षा जादा खर्च केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी यंत्रणेची राहील. सदरचे कामांना वितरीत होणारा निधी चालू वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी पूर्ण खर्च होईल याची खबरदारी घेण्यात यावी.
४. अंदाजपत्रकातील कामाच्या वर्णनाप्रमाणे काम दर्जेदार करण्याची जबाबदारी यंत्रणेची राहील.
५. जिल्हाधिकारी यांचेकडे मंजुर केलेल्या कामांचा प्रगती अहवाल दर महिन्याचे ५ तारखेपर्यंत पाठवावा.
६. मंजूर काम शासकीय/ग्रामपंचायत/नगरपालिका मालकीच्या जागेवर करावे.जागा उपलब्ध असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे. खाजगी संस्था/ सरकारी संस्था/ट्रस्ट यांची कामे घेता येणार नाहीत.
७. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकातील सूचनांचे अनुपालन करून कामे पुर्ण करावीत.
८. मंजूर केलेले काम पूर्ण झाल्यानंतर हे संबंधीत यंत्रणेकडे पुढील देखभालीसाठी हस्तांतरीत करावे व पूर्णत्वाचा व हस्तांतरणाचा दाखला जिल्हाधिकारी यांना सादर करावा. देखभाल व दुरुस्तीसाठी काम ताब्यात घेणार असल्याचे हमीपत्र अगोदरच संबंधितांकडून प्राप्त करुन घेतले नसल्यास ते प्राप्त केल्याशिवाय काम सुरु करु नये.
९. सदरचे काम कार्यवाही यंत्रणेमार्फत आणि जिल्हयातील ईतर यंत्रणेमार्फत अन्य योजनेतुन झालेले नाही अथवा सुरु नाही किंवा मंजूर नाही याची यंत्रणेनी पूर्ण खात्री करुन घ्यावी. तसे प्रमाणपत्र सादर करावे.
१०. या निधीतुन जी बांधकामे हाती घेण्यांत येतील. ती शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जागेवर घेण्यात यावे व त्यावर संबंधीत शासन यंत्रणेची मालकी राहील.
११. **या कामावर होणारा खर्च खालील लेखाशिर्षातून करावा.**
**मागणी क्रमांक ओ-१०,**
**४५५१-डोंगराळ क्षेत्रावरील भाडंवली खर्च -राज्य योजनांतर्गत योजना-६०.**
**इतर डोंगरी क्षेत्रे (००)(०१),**
**डोंगराळ क्षेत्राकरीता विशेष विकास कार्यक्रम (४५५१ ००११) (योजनांतर्गत)**
१३. मंजूर करण्यात येणारे काम हे प्रशासकीय मंजूरी दिलेल्या नकाशे व अंदाजपत्रकानुसारच कार्यान्वीत करण्यांत यावे.
१४. शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सदरील काम एक ते दोन वर्कींग सिझनमध्ये पूर्ण करणे बंधनकारक राहील.
१५. अंगणवाडी खोल्याचे बांधकाम शासनांनी विहीत केलेल्या टाईप डिझाईन नुसारच करावयाचे असून विहित आर्थिक मर्यादेतच खर्च करावयाचा आहे.
१६. शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सदरचे काम पूर्ण होताच कामाच्या दर्शनी भागावर डोंगरी विकास कार्यक्रमांतर्गत घेण्यांत आलेल्या कामाचे नाव,वर्ष व खर्च लिहावा.
१७. रस्त्याचे काम करतांना आवश्यक crust thickness आहे याची खात्री करून कॉंक्रिट करावे.

सही/-
**जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा नियोजन समिती,हिंगोली**

प्रत :- कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली यांना माहितीस्तव व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव

प्रत माहितीस्तव सादर : १. मा.आ.श्री. भाऊराव पाटील, विधानसभा सदस्य, हिंगोली,
२. मा.आ.श्री. राजीव सातव, विधानसभा सदस्य, कळमनुरी
3. NIC Hingoli

**जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा नियोजन समिती,हिंगोली**

Dong AA 2010 11

## विवरणपत्र "अ"

(रू.लाखात)

| अ. क्र. | यंत्रणेचे/कामांचे नांव | अंदाजपत्रकीय किमंत | प्रशासकिय मंजुरी दिलेली तरतुद |
|---|---|---|---|
| | **कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, हिंगोली** | | |
| | **हिंगोली उपगट** | | |
| १ | गोरेगाव ता.सेनगाव ते गोटवाडी जोडरस्त्याचे बांधकाम करणे कि.मी. 0/660 ते 1/200 कि.मी. अंदाजे (खडीकरणासह) | ८.८४ | ८.८४ |
| २ | जामदया ता.सेनगाव ते हुंडी तांडा जोडरस्त्याचे बांधकाम करणे कि.मी.0/00 ते 2/00 कि.मी. (खडीकरणासह) | १३.९९ | १३.९९ |
| ३ | मौ. नर्सी (ना.) ता. हिंगोली ग्रा.पं. हद्दीत इदगाह ते इडोळी काळकोंडी जाणा-या रस्त्याचे मजबुतीकरण करणे | ४.४६ | ४.४६ |
| ४ | मौ. वैजापूर ग्रा.पं. हद्दीत ता.हिंगोली येथे सार्वजनिक जागेवर अंगणवाडीचे बांधकाम करणे | २.८६ | २.८६ |
| ५ | मौ. हनवतखेडा ता. हिंगोली येथे जोडरस्त्याचे खडीकरण व मजबुतीकरण (कडती रस्त्यास जोडणे) करणे | ४.९३ | ४.९३ |
| | **एकुण हिंगोली उपगट** | ३५.०८ | ३५.०८ |
| | **कळमनुरी उपगट** | | |
| १ | चिंचोली ते कोयाळी मार्ग येळी फाटा रस्ता कि.मी.0/00 ते 1/200 चे नविन रस्त्याचे मजबूतीकरण करणे | १०.०९ | १०.०० |
| २ | सुरेगाव ते तळणी ता. औंढा नवीन रस्त्याचे बांधकाम (खडीकरणासह) करणे 710 मी. | ९.९० | ९.९० |
| | **एकुण कळमनुरी उपगट** | १९.९९ | १९.९० |
| | **एकुण डोंगरी विकास कार्यक्रम** | **५५.०७** | **५४.९८** |

जिल्हाधिकारी व सदस्य सचिव
जिल्हा नियोजन समिती,हिंगोली करिता